आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ एप्रिल २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातल्या नागरिकांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची मुख्यमंत्र्यांची  घोषणा

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची विरोधी पक्षनेत्यांची मागणी

- काश्मीर खोऱ्यातली  ४८ पर्यटन स्थळं पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा जम्मू कश्मीर सरकारचा निर्णय

- शिक्षण आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या गुंतवणुकीसाठीच्या युग्म परिषदेचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- यांप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक निर्माते प्रकाश भेंडेचं निधन

<><><><><><>

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातल्या नागरिकांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.

**होल्ड बाईट...फडनवीस**

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत पहलगाम हल्ल्यातल्या मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तसंच त्यांच्या कुटुंबियांना शिक्षण आणि रोजगारासाठी मदत करणार असल्याचंही सरकारनं सांगितलं. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले संतोष जगदाळे यांची मुलगी आसावरी जगदाळे यांना सरकारी नोकरी देण्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ एप्रिल २०२५ - मंगळवार

<><><><><><>

काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी, पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची मागणी केली आहे. तसं पत्र त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलं आहे. दहशतवादाविरुद्ध देशाची एकता दर्शवण्यासाठी आणि मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी हे विशेष अधिवेशन बोलावावं असं पत्रात म्हटलं आहे. काँग्रेसच्या या मागणीवर भाजपाने टीका केली आहे. ही वेळ चर्चा करण्याची नसून पाकिस्तानला धडा शिकवण्याची असल्याचं ज्येष्ठ नेते अनुराग ठाकूर यांनी म्हटलं आहे. काँग्रेसने या संदर्भात आधी आपली भूमिका स्पष्ट करावी असं आवाहन भाजपा प्रवक्ता शहजाद पूनावाला यांनी केलं आहे. काँग्रेसच्या काही नेत्यांनी या हल्ल्यासाठी भारतालाच जबाबदार धरलं आहे, असं ते म्हणाले.

<><><><><><>

पहेलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर काश्मीर खोऱ्यातली ४८ पर्यटन स्थळं पर्यटकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय जम्मू कश्मीर सरकारने घेतला आहे. खोऱ्यात एकूण ८७ पर्यटनस्थळं आहेत. इतर स्थळांना योग्य सुरक्षा पुरवल्याचं सरकारनं म्हटलं आहे. पहेलगाम हल्ल्यानंतर काश्मीरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षणीयरित्या घटली आहे. श्रीनगर विमानतळावरची प्रवाशांची वर्दळही कमी झाली आहे.

<><><><><><>

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जनता वृत्तपत्राच्या तीन खंडाचं प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मंत्रालयात झालं. यात खंड क्र. ७, ८ आणि ९ या तीन खंडासह इंग्रजी खंड ४ चं मराठी भाषांतर आणि इंग्रजी खंड २ च्या नव्या आवृत्तीचा समावेश आहे. प्रकाशन कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ

शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

<><><><><><>

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण म्हणजेच म्हाडाच्या वांद्रे मुख्यालयातल्या सुविधांचं उद्घाटन काल म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी केलं. नागरी सुविधा केंद्र, अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली, ऑफिस लोकेटर प्रणाली या सुविधांचा यात समावेश आहे. म्हाडाच्या अद्ययावत संकेतस्थळाचं अनावरणही जयस्वाल यांनी केलं. वरळी बीडीडी चाळ पुनर्विकासातल्या लाभार्थ्यांना त्यांच्या सदनिकांचा लवकरच ताबा दिला जाईल.तसंच म्हाडा मुंबई मंडळातर्फे येत्या सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये सुमारे ५००० सदनिकांची संगणकीय सोडत काढली जाणार आहे असं जयस्वाल यांनी यावेळी सांगितलं.

म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील 'सुकर जीवनमान', 'संकेतस्थळ' या महत्त्वपूर्ण घटकांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

_<><><><><><>

जळगाव जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेवर नियंत्रण मिळवण्यासाठी धमकी दिल्याप्रकरणी मंत्री गिरीश महाजन यांना मुंबई उच्च न्यायालयानं दिलासा दिला आहे. या प्रकरणाच्या सीबीआय चौकशीला आव्हान देणारी याचिका न्यायालयानं निकाली काढली आहे. न्यायालयानं म्हटलं आहे की, सीबीआयनं महाजन यांच्या विरोधात कोणतेही पुरावे नसल्यामुळे हे प्रकरण बंद केल्याचा अहवाल मुंबई उच्च न्यायालयात सादर केला आहे. याचिका कर्ते संस्थेचे संचालक

भास्कर पाटील यांनी सीबीआयच्या अहवालाला आव्हान देणारी याचिका दाखल करायला हवी.

<><><><><>

शिक्षण आणि नवोन्मेष क्षेत्रात देशाचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि त्याला चालना देण्यासाठी, भारताची संशोधन परिसंस्था मजबूत करणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विकसित भारतासाठी शिक्षण, उद्योग आणि नवोन्मेष क्षेत्राला एकत्रित आणणाऱ्या युग्म संमेलनात ते बोलत होते. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं हे संमेलन होत आहे. या तिनही क्षेत्रात सरकार करत असलेल्या कामांची, आणि भविष्यातल्या योजनांची माहिती मोदी यांनी यावेळी दिली. युग्म अर्थात - Youth, University, Government, and Market, हा एक प्रकारचा पहिलाच धोरणात्मक मंच असून, यात सरकार, शिक्षण, उद्योग आणि नवोन्मेष क्षेत्रातलं नेतृत्व एकत्र येत आहे.

<><><><><>

वेव्हज् २०२५ परिषद उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. या परिषदेमुळे देशातल्या तरुणांना खूप लाभ होईल, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी म्हटलं आहे. वेव्हजच्या केंद्रस्थानी आजची तरुणाईच असून कौशल्यविकास, स्वयंउद्योजकता आणि जागतिक सहकार्य क्षेत्रातल्या नव्या वाटा यामुळे खुल्या होतील, असा विश्वास त्यांनी यासंदर्भातल्या लेखात व्यक्त केला आहे.

<><><><><>

पुण्यात, शिवाजीनगर पोलिसांनी बनावट चलनी नोटा तयार करणारी टोळी उघडकीस आणून चार जणांना अटक केली. त्यांच्याकडून २८ लाख रुपयांच्या बनावट नोटा आणि साहित्य जप्त करण्यात आलं.

<><><><><>

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात अवैधरित्या राहणाऱ्या सहा बांगलादेशी नागरिकांना काल पोलिसांनी अटक केली. त्यांच्यावर महात्मा फुले पोलीस ठाणे, टिळकनगर पोलीस ठाणे, खडकपाडा आणि बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

<><><><><><>

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स हा सामना दिल्लीत रंगणार आहे. सामना संध्याकाळी साडेसातला सुरु होईल.

काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सचा आठ गडी राखून पराभव केला. गुजरात टायटनच्या २०९ धावांना प्रत्युत्तर देताना राजस्थान रॉयल्सने २५ चेंडू राखत हे आव्हान पार केलं.

<><><><><><>

प्रसिद्ध मराठी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि वितरक  प्रकाश भेंडे यांचं काल मुंबईत  वृद्धापकाळानं  निधन झालं. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. **आई थोर तुझे उपकार,  आपण यांना पाहिलंत का?,  चटक चांदणी** या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांनी केलं होतं  तर **भालू,  चटक चांदणी,  प्रेमासाठी वाट्टेल ते,  आई थोर तुझे उपकार** या चित्रपटांची त्यांनी निर्मिती केली होती.

//<><><><><><>//

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ एप्रिल २०२५ - मंगळवार